Vol 5 Issue 9 Oct 2015

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850

Impact Factor : 3.1560(UIF)
Volume - 5 | Issue - 9 | Oct - 2015

# नंदुरबार जिल्हयातील शेतक—यांच्या पिक रचनेची प्रवृत्ती

शामराव भगवान वायसे
सहयोगी प्राध्यापक (अर्थशास्त्र विभाग) जी.टी.पाटील महाविदयालय नंदुरबार.

Co - Author Details :

सरोदे राजेंद्र मधुकर
व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख , दादासाहेब देविदास नामदेव भोळे महाविदयालय, भुसावळ जि.जळगाव.

**सारांश**

प्रस्तुत संशोधनात नंदुरबार जिल्हयातील शेतक—यांच्या पिक रचनेची प्रवृत्ती (कालखंड 2003-04 ते 2013-14) यावर सर्वेक्षणात्मक संशोधन करुन निष्कर्ष व उपाययोजना सुचविलेल्या आहेत 250 शेतक—यांच्या मुलाखतीच्या माध्यमातुन संशोधकास जिल्हयातील पिकरचना, उत्पादन खर्च, आदानातील बदल यासंबंधी निष्कर्ष मांडले असून सखोल व डोंगरी भागातील शेतक—यांच्या उत्पादनात पिकरचनेत तफावत आढळून आली आहे. कृषी विकासा बरोबर शेतकरी अन्नधान्य पिकांकडून व्यापारी पिकांकडे वळला आहे. तो व्यावसायिक पध्दतीने शेती करत आहे. आदिवासी व बिगर आदिवासी शेतक—यांच्या पिकरचनेत बदल असून आदिवासी शेतकरी आजही अन्नधान्य, भाजीपाला, फळझाडांचे उत्पादन घेत आहे. तर सखल भागातील शेतकरी व्यापारी पिकांचे उत्पादन घेत आहे. संशोधनाच्या कालखंडात जिल्हयातील पिक रचना बदलली आहे.



**बिज शब्द :—** पिक, आदाने, संस्था, उत्पादन.

**प्रस्तावना :—**

मुंबई राज्यातील ब्रिटीश प्रशासक स्टार्ट यांच्या अध्यक्षतेखाली 1930 मध्ये आदिवासी विकासाचा आढावा घेण्यासाठी समिती नेमली. या समितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर व ठक्करबाप्पा यांचा समावेश होता. त्यांनी आदिवासी व दलितांच्या शिक्षण,आर्थिक आणि समाजिक स्थिती या विषयी अहवाल सादर केला. यातुनच 1938 मध्ये नेमलेल्या डॉ.सिमिंग्टन समितीच्या शिफारशीवरुन धुळे जिल्हयाचे विभाजन करुन 1 जुलै 1998 रोजी आदिवासी बहुल नंदुरबार जिल्हयाची निर्मिती केली. नंदुरबार,नवापूर, तळोदा, शहादा, अक्कलकुवा, अक्राणी (धडगाव) या सहा तालुक्यांचा जिल्हयात समावेश असून एकूण लोकसंखेच्या 65.53 टक्के लोकसंख्या आदिवासी जमातीची आहे. जिल्हयात 947 गावांचा समावेश होतो. यामध्ये अक्कलकुवा 193,अक्राणी 163, तळोदा 93,शहादा 183,नवापूर 162 व नंदुरबार 153 गावांचा समावेश होतो. 2011 च्या जणगणनेनुसार जिल्हयाची लोकसंख्या 16,46,177 एवढी असून दर हजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या 972 आहे. तर साक्षरतेचे प्रमाण 63.04 टक्के आहे. जिल्हयात ग्रामीण लोकसंख्या 83.28 टक्के व नागरी लोकसंख्या 16.72 टक्के आहे. जिल्हयातील नागरिकांचा प्रमुख व्यवसाय शेती असून जिल्हयातील शेती वैशिष्टयपूर्ण आहे.

राज्यात नंदुरबार हा आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. राज्याच्या एकूण अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येपैकी 10.02 टक्के लोकसंख्या असून राज्यात जिल्हयाचा चौथा क्रमांक लागतो. जिल्हयातील आदिवासी जमातीमध्ये विविधता असून भाषा,रुढी—परंपरा,चाली—रिती,लग्न—समारंभ, या मध्ये भिन्न्ता आढळून येते. आदिवासी समाज हा निसर्गपुजक व स्त्रिपुजक असून स्त्रियांना कुटूंबात मानाचे स्थान असते. आदिवासी जमातीचे जिवनमान हे अन्न,दारु व सावकार यांच्या भोवती फिरत असून तो रोजगारासाठी मोठया प्रमाणात स्थलांतर करतो. तो आजही प्राथमिक व्यवसायात गुंतलेला असून रुढी—परंपरेचा मोठा पगडा त्याच्यावर आहे. जिल्हयातील आदिवासी शेतक—यांना नवीन तंत्रज्ञानाचा अभाव,आधुनिक आदाने,संस्थात्मक वित्तपुरवठयाची कमतरता, बाजारपेठा—साठवणुकीच्या परंपरागत पध्दती,माहिती प्रशिक्षणाचा अभाव,व्यसनाधिनतेचे वाढते प्रमाण,प्रक्रिया—पुरक उदयोगांची कमतरता, वहातुक—दळणवळणातील

समस्या,व्यावसायिक पणाचा अभाव,भोळा–भाबडा स्वभाव यामुळे आदिवासी समाज आजही शेतीतील बदल सहजासहजी स्विकारत नाही. कृषी व कृषी संबंधीत समस्यांचा अभ्यास करुन त्यावर उपाय योजना सुचविन्यासाठी,आदिवासी शेतकरी मुख्य प्रवाहात येण्यासाठी,त्यांना व्यापार–शर्ती अनकुल होण्यासाठी या विषयावर संशोधन होणे आवश्यक असल्याने हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

### *उददेश :–*

1) नंदुरबार जिल्हयातील पिकरचनेच्या बदलाचे अध्ययन करणे.
2) शेतकरयांच्या कृषी उत्पादन–खर्चाच्या प्रवृत्तीचे अध्ययन करुन उपाय योजना सुचविणे.
3) कृषी व्यवसायातील बदलांचा शेतक–यांवरील परीणांमांचे अध्ययन करणे.

### *गृहिते :–*

1) सातपुडयातील व सखल भागातील शेतक–यांच्या पिक रचनेत भिन्नता आहे.
2) कृषी तंत्रातील बदल,आदाणे व संस्थात्मक वित्त पुरवठयामुळे कृषी उत्पादनात वाढ होत आहे.
3) कृषी विकास व कृषी पुरक व्यवसायामुळे स्थलांतर व कुपोषण कमी होत आहे.

### *अध्ययन पध्दती :–*

प्रस्तुत संशोधनासाठी नमुना निवड पध्दतीचा वापर करुन जिल्हयातील सहा तालुक्यातील 250 शेतक–यांची निवड केली आहे. यामध्ये नंदुरबार तालुक्यातील 50 शेतकरी,नवापुर 40, शहादा 40, अक्राणी 40, तळोदा 40, अक्कलकुवा तालुक्यातील 40, शेतकरयांच्या समावेश आहे. प्राथमिक सामग्रीत प्रामुख्याने मुलाखत–अनुसूचीचा वापर केला आहे. संशोधन कालखंड (2003.04 ते 2013.14) असा 10 वर्षाचा निवडला आहे.

द्वितीय साधन सामग्रीत प्रकाशीत व अप्रकाशीत साधनांचा अवलंब केला आहे. यामध्ये जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, आदिवासी विभाग नाशिक यांचे विविध अहवाल,आर्थिक सर्वेक्षण,विविध वर्तमान पत्र,वेबसाईट,मासिके,पीएच.डि अप्रकाशीत प्रबंध, न्यूज चॅलन,ॲग्रोवन,कृषी विभाग अहवाल,संदर्भ ग्रंथ यांना आधारभूत माणून माहिती संकलीत केली आहे.

### *नंदुरबार जिल्हयातील कृषीची स्थिती :–*

जिल्हयातील एकूण जमिनीच्या 40 टक्के जमीन हलक्या प्रतीची,35 टक्के मध्यम प्रतीची व 25 टक्के जमीन काळी कसदार आहे. जिल्हयाचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ 5,03,423 हेक्टर ऐवढे असून लागवडी खालील एकूण क्षेत्र 3,13,076 हेक्टर आहे. तर लागवडी लायक क्षेत्र 3,60,760 हेक्टर आहे. बिगरशेती खालील क्षेत्र 28,117 हेक्टर आहे. तर जंगल व्याप्त क्षेत्र 103,930 हेक्टर असून एकूण भौगोलिक क्षेत्राचा 20.64 टक्के आहे. तर पडीत जमीन 26,350 हेक्टर आहे. जिल्हयात 8 मध्यम प्रकल्प असून 223 लघुसिंचन प्रकल्प व 385 कोल्हापूर बंधारे आहेत,21,544 सिंचन विहिरी आहेत. नर्मदा व तापीच्या खो–यांत नैसर्गिक दृष्टया समृध्द् जिल्हा असून तापी नदीवर प्रकाशा व सारंगखेडा येथे बंधारे आहे. नर्मदा सरोवरात जिल्हयातील 33 गावातील 4,227 कुटूंबाची 1519 हेक्टर शेतजमीन व 6,288 वनक्षेत्र आणि इतर क्षेत्र 1,592 हेक्टर असे एकूण 9,399 हेक्टर क्षेत्र बुडीताखाली गेलेले आहे. जिल्हयात एकूण ओलीताखालील क्षेत्र 20.34 टक्के आहे.

नंदुरबार जिल्हयातील शेतजमीन सर्वच पिकांसाठी उपयुक्त असून सखल व डोंगरी भागात पिक रचनेत बदल दिसून येतो. सखल भागात व्यापारी पिके घेतली जातात. यामध्ये कापूस, ऊस, केळी, पपई यांचा समावेश असून सातपुडयात व डोंगरी भागात विशेषतहा तृनधान्य, कडधान्य यांचे उत्पादन घेतले जाते. डोंगरी भागात फळझाडीची लागवड मोठया प्रमाणावर होत आहे. यामध्ये आंबा, सिताफळ, महु, काजू, चिंच, यांचा प्रामुख्याने समावेश होतो.

### *नंदुरबार जिल्हयातील पिकरचना व उत्पादन*

जिल्हयातील शेतकरी सर्वच पिकांचे उत्पादन घेत असून सखोल भागातील शेतकरी व सातपूडयातील शेतकरी यांच्या पिक रचनेत उत्पादन पध्द्तीत आदानांमध्ये पुरक व्यवसाय व प्रक्रिया व्यवसायाने मोठी तफावत आढळून येते. पर्यायाने शाहू समाज व आदिवासी समाजातील शेतक–यांच्या उत्पादन पध्द्तीत व पिक पध्द्तीत फरक दिसून येतो. आदिवासी शेतकरी आजही पारंपारिक पध्द्तीने सेंन्द्रिय शेती करतो. तर सखोल भागातील शाहू समाजातील शेतकरी आधुनिक पध्द्तीने रासायनिक खतांचा वापर अधिक करतो. परिणामी उत्पादनात फरक पडत आहे. संशोधनाच्या 10 वर्षाचा कालावधीत पीक रचना बदलत असून शेतकरी अन्नधान्ये, कडधान्ने, व्यापारी पिके, तेलबिया यांचे उत्पादन घेत आहे.

### जिल्हयातील प्रमुख पिकांचे दर हेक्टरी व एकूण उत्पादन

| अ.क | पिकांचे नाव | 2003—2004 | | 2013 —2014 | | प्रति हेक्टरी उत्पादन वाढ/घट : | एकूण उत्पादन वाढ/घट : |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रति हेक्टरी उत्पादन किलो | एकूण उत्पादन मे. टन मध्ये | प्रति हेक्टरी उत्पादन किलो मध्ये | एकूण उत्पादन मे.टन मध्य | | |
| 1 | तांदुळ | 790 | 177 | 1235 | 281 | 56.33 | 58.76 |
| 2 | गहु | 1652 | 152 | 2266 | 127 | 37.70 | .16.45 |
| 3 | ज्वारी | 1236 | 684 | 2142 | 433 | 73.30 | 30.70 |
| 4 | बाजरी | 1022 | 195 | 1043 | 59 | 2.05 | .69.74 |
| 5 | मका | 2125 | 336 | 1841 | 170 | .13.36 | .49.40 |
| 6 | एकूण.तृण धान्य | 1284 | 1577 | 8527 | 1570 | 564.10 | .0.44 |
| 7 | हरभरा | 738 | 91 | 1033 | 131 | 39.97 | 32.97 |
| 8 | तुर | 338 | 79 | 413 | 50 | 22.19 | .36.71 |
| 9 | उडीद | 975 | 184 | 387 | 52 | .60.31 | .71.74 |
| 10 | मुंग | 938 | 150 | 383 | 51 | .59.17 | .66 |
| 11 | एकूण. कडधान्य | 653 | 531 | 2714 | 280 | 315.62 | .47.27 |
| 12 | भुई.मुंग | 852 | 72 | 705 | 139 | .17.25 | 93 |
| 13 | ऊस | 65 | 2665 | 70 | 7857 | 7.69 | 194.82 |
| 14 | कापूस | 409 | 122 | 785 | 802 | 91.93 | 557.38 |
| 15 | लाल मिरची | 860 | 18 | 940 | 17 | 9.30 | .5.56 |

संदर्भ :— जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन 2004—05 ते 2013.14

जिल्हयातील शेतक—यांच्या पिक रचनेत बदल होत असून शेतकरी अन्नधान्य उत्पादनाकडून व्यापारी पिकांकडे आकर्षित होत आहे. जिल्हयातील कृषी उत्पादनात सातत्याने बदल होत असून प्रतिहेक्टरी व एकूण उत्पादनात बदल झाला आहे. एकूण तृणधान्य उत्पादनात —0.44 टक्के घट 2003-04 ते 2013-14 या दहा वर्षाच्या कालावधीत झाली आहे. तर याच कालावधित एकूण कडधान्य उत्पादनात —47.27 टक्के एकूण उत्पादनात घट झाली आहे. आज व्यापारी पिकात याच कालावधित भूईमूग —17.25 टक्के घट आहे. तर ऊस 7.69 टक्के वाढ असून जिल्हयात सर्वाधिक वाढ कापूस उत्पादनात होत असून ती 91.93 टक्के वाढ झाली आहे. जिल्हयात सर्वच तालुक्यात कापसाचे उत्पादन घेतले जात असून शहादा, नंदुरबार, नवापूर, तळोदा या तालुक्यात डबल बी.टी. वाणांचा वापर आहे. तर डोंगरी भागात सिंगल बी. टी. वाणांचा वापर होत आहे. जिल्हा मिरची उत्पादनात राष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध होता. आज कृषी विकासातील बदलाबरोबर मिरची उत्पादनाच्या क्षेत्रात घट होत आहे. या कालावधित मिरची उत्पादनात नाममात्र 9.30 टक्के वाढ झाली आहे.

### जिल्हयातील शेतक—यांची पिक रचना व उत्पादन :—

जिल्हयातील शेतकरी उपलब्ध साधन सामग्रीनुसार पिके घेत असून सखोल व डोंगरी भागात पीक पद्धती व शेती कसण्याच्या पद्धतीत फरक असल्याने उत्पादनात असमानता दिसून येते. डोंगरी भागात फळझाडांची शेती मोठया प्रमाणावर असून बायफ अंतर्गत नवीन झाडांची लागवड वाढत आहे.

| अ.क. | पिके | भोतकरी | लगवडी खालील एकर. क्षेत्र | लागवडीखालील क्षेत्राची टक्केवारी | उत्पादन रु. | सरासरी उत्पादन |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अन्नधान्य | 70 | 900 | 39.41 | 31264202 | 34738 |
| 2 | व्यापारीपिके | 80 | 590 | 25.88 | 39454321 | 66872 |
| 3 | कडधान्य | 40 | 510 | 22.37 | 25324059 | 49655 |
| 4 | गळीत धान्य | 35 | 190 | 8.33 | 8014560 | 42182 |
| 5 | भाजीपाला व फळझाडे | 25 | 90 | 3.94 | 3401940 | 37799 |
| | एकूण | 250 | 2280 | 100 | 10745902 | 47131 |

संदर्भ :– प्रत्यक्ष मुलाखतीवरुन

सर्वेक्षीत 250 शेतक–यांनी 2280 एकरक्षेत्रावर 39.47 टक्के अन्नधान्य, 25.88 टक्के क्षेत्रावर व्यापारी पिके, 22.37 टक्के कडधान्य 8. 33 टक्के गळीत धान्य व भाजीपाला तर फळझाडे 94 टक्के क्षेत्रावर पीक घेतले आहे. सर्वाधिक अन्नधान्य पिकांचा क्रम लागतो. त्याखालोखाल व्यापारी पिकांचा क्रम लागतो. एकूण उत्पादन रु. 10,7459082 असून प्रति एकर रु. 47131 उत्पादन झाले आहे.सर्वाधिक व्यापारी पिकापासून उत्पादन प्रति एकर रु. 66872 आहे. तर त्याखालोखाल कडधान्य रु. 49655, गळीत धान्य रु.42182 भाजीपाला व फळझाडे 37799 व सर्वात कमी उत्पादन रु. 34738 अन्नधान्य पिकापासून मिळले आहे. सखल भागात व्यापारी पिके तर डोंगरी भागात घरगुती वापरासाठी भाजीपालाचे उत्पादन घेतले जाते.

### *धारण क्षेत्रानुसार शेतक–यांचा सरासरी व एकूण उत्पादन खर्च :–*

जिल्हयात पिक पद्धती, शेतीचा आकार, शेतक–यांची आर्थिक स्थिती बाजारपेठा उपलब्धता या बाबींचा उत्पादन खर्चावर सर्वाधिक प्रभाव पडलेला आहे. त्याच बरोबर शेतक–यांचे वयोमान, शिक्षण, वित्तपुरवठा, यासारख्या बाबीचा परिणाम उत्पादन खर्चावर होत आहे.

| अ.क्र. | धारण क्षेत्र | शेतकरी संख्या | एकूण धारण क्षेत्र | प्रति एकर सरासरी खर्च (रु) | एकूण खर्च (रु.) | एकूण खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | एक एकर पर्यंत | 40 | 40 | 3840 | 138450 | 0.51 |
| 2 | 1 ते 3 | 52 | 150 | 8260 | 1082620 | 4.02 |
| 3 | 3 ते 5 | 55 | 245 | 10100 | 2402189 | 8.93 |
| 4 | 5 ते 10 | 57 | 680 | 9560 | 4902531 | 18.23 |
| 5 | 10 ते 30 | 28 | 635 | 14500 | 8421505 | 31.31 |
| 6 | 30 च्या पुढे | 18 | 530 | 16450 | 9952351 | 37 |
| 7 | एकूण | 250 | 2280 | 11798 | 26899646 | 100 |

संदर्भ :– प्रत्यक्ष मुलाखतीवरुन

शेती क्षेत्रात घटत्या उत्पादन फलाचा नियम अनुभवास येत असून प्रत्यक्ष सर्वेक्षणानूसार मोठया धारण क्षेत्र असणा–या शेतक–यांच्या कृषी उत्पादन खर्च अधिक आहे तर लहान धारण क्षेत्र असणा–या शेतक–यांचा उत्पादन खर्च सर्वात कमी आहे. सर्वेक्षीत 250 शेतक–यांनी 2280 एकरवर विविध पिकांवर उत्पादनानुसार एकूण रु. 26899646 खर्च केला असून प्रति एकर सरासरी खर्च रु.11798 आहे. सर्वाधिक सरासरी कृषी उत्पादन खर्च मोठया शेतक–यांचा 300 एकरपुढील रु.16450 आहे. तर सर्वात कमी एक एकरपर्यंत धारण क्षेत्र असणा–या शेतक–यांचा रु.3840 ऐवढा आहे. शहादा तालुक्यातील शेतक–यांचा कृषी खर्च सर्वात जास्त आहे. तर सर्वात कमी अक्राणी तालुक्यातील शेतक–यांचा आहे. पिकरचनेचा खर्चावर परिणाम होत असून व्यापारी पिकांचा सर्वाधिक खर्च आहे. तर अन्नधान्य पिकांवरील सर्वात कमी खर्च आहे. मोठया शेतक–यांचा मजूरी वरील खर्च वाढत आहे.

### *शेतक–यांचा कृषी उत्पादनाचा विविध बाबीवरील खर्च :–*

शेतीचा आकार, वाढत्या आदानांच्या किमती, पीक पद्धत, कृषी व्यापारीकरण, शेतक–यांच्या अपेक्षा, याबाबींमुळे कृषी भांडवलीकरणामुळे खर्च वाढत आहे.

| अ.क्र. | खर्च बाब | एकूण खर्च | एकूण खर्चाशी प्रमाण टक्के |
|---|---|---|---|
| 1 | बी. बीयाणे | 4438442 | 16.50 |
| 2 | खते, ओषधे | 7800897 | 29 |
| 3 | मजुरी | 6993908 | 26 |
| 4 | कृषी-अवजारे | 2528567 | 9.40 |
| 5 | विज-बिल | 1291183 | 4.80 |
| 6 | इंधन | 968387 | 3.60 |
| 7 | विक्रीसाठी | 1344982 | 5 |
| 8 | इतर | 1506380 | 5.60 |
| 9 | एकूण | 26899646 | 100 |

स्त्रोत :– प्रत्यक्ष मुलाखतीवरुन.

सवैक्षीत शेतक–यांनी 2280 एकर क्षेत्रावर विविध पिकांवर एकूण रु.26899846 एवढा खर्च केला असून प्रति एकर कृषी उत्पादनाचा सरासरी खर्च रु.11798 आहे सर्वाधिक शेतक–यांचा खर्च 29 टक्के हा खते आणि औषधांवरील असून रासायनिक खतांचा वाढत्या किंमतीमुळे

खर्चात सातत्याने वाढ होत आहे. त्या खालोखाल मजुरीवरील खर्च एकूण खर्चाच्या 26 टक्के आहे. शहरालगत शेतक–यांना मजूरांची समस्या मोठी असून कृषी आदानांचा कौशल्यपूर्ण वापर नव शेतमजूरांना येत नाही असे सर्वेक्षणात निदर्शनास आले. मोठया व लहान शेतकरयांच्या कृषी उत्पादन खर्चातील वाढत्या किंमती पातळी मुळे सर्वच बाबींवरील खर्च वाढत चालला आहे.

### *निष्कर्ष :–*

नंदुरबार जिल्हयाच्या कृषी उत्पादनात सर्वेक्षीत कालखंडात सातत्याने वाढ होत आहे. मात्र या वाढिचे स्वरुप कृषी विकासाबरोबर बदलत आहे. जिल्हयातील शेतकरी परंपरागत शेती ऐवजी व्यापारी पिकांकडे आकर्षित होत आहे. शेती हा जीवन जगण्याचा मार्गा ऐवजी तो व्यावसायिक पध्द्तीने शेती करत आहे. शेतीतील धोका आणि अनिश्चितता टाळण्यासाठी तो पिक विम्याचा आधार घेत आहे. खाजगी कर्जा ऐवजी तो संस्थात्मक कर्ज घेत असून पिक कर्ज व तारण कर्ज घेऊन शेतीत गुंतवणूक करत आहे. पर्यायाने कृषी उत्पादनात वाढ होत आहे. ही वाढ तालुका सापेक्ष, शेतकरी सापेक्ष अशी आहे. जिल्हयातील प्रत्येक तालुक्याची वैशिस्ट भिन्न असल्याने शेतीच्या उत्पादनाच्या रचनेवर परिणाम झाला आहे. सखल व डोंगरी भागात पिक रचना वेगळी आहे. सखल भागात व्यापारी पिकांचा समावेश सर्वाधिक आहे. तर डोंगरी भागात अन्नधान्य, द्विदलधान्य, भाजीपाला, फळझाडे, यांचा सर्वाधिक हिस्सा आहे. कृषी तंत्रज्ञानात बदल झाल्याने व तो बदल शेतक–यांनी आत्मसात केल्याने कृषी उत्पादनात वाढ झाली आहे. जिल्हयात बेरोजगारी, कुपोषणाची मोठी समस्या आहे. मात्र कृषी विकासाबरोबर स्थलांतराचे प्रमाण कमी होऊन कुपोषण नियंत्रणात येण्यास मदत झाली आहे.

### *कृषी उत्पादकता वाढण्यासाठी उपाय योजना :–*

नंदुरबार जिल्हयात शेती क्षेत्राचे असमान वाटप असून लहान–सिमांत –मोठे शेतकरी यांच्यात मोठी विषमता आहे. विषमता कमी करण्यासाठी कमाल जमीन धारण कायदयाची प्रभावी अंमलबजावणी करावी. जिल्हयात शेतीची विभागणी सखोल व डोंगराळ भाग अशी असून स्थानिक परिस्थिती नुसार नियोजन करुन कृषी विकासाची यशस्वी कार्यवाही करावी. डोंगरी भागात कृषी आदानांचा वाढता विस्तार करावा. सोईनुसार पाणी, विज, जलसिंचन सुविधामध्ये वाढ करावी. शेतक–यांना संस्थात्मक वित्तपुरवठा योग्य वेळी, योग्य प्रमाणात योग्य व्याजाने करावा. पर्याप्त वित्तपुरवठयातुन कर्जाची गरज पूर्ण करावी. धोका व अनिश्चितता कमी करण्यासाठी पिक विमा योजनेची प्रभावी अंमल बजावणी करावी. सामुहिक शेतीच्या प्रयोगाबरोबर कृषी प्रक्रिया उदयोगास चालना दयावी. केंन्द्र राज्य सरकारच्या कृषी विभागाच्या योजनांचा प्रसार, प्रचार ग्रामीण भागात करुन प्रभावी अंमलबजावणी करावी. शेतक–यांनी पाणी, माती, परिक्षण करावे. नर्मदा नदीचे पाणी सातपुडयात आणावे तापी नदीवरील बंधा–यातील पाण्याचा वापर उपसासिंचन योजनांच्या माध्यमातून शेतात पोहचवणे शेतकरी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करुन अक्राणी व अक्कलकुवा तालुक्यातील शेतक–यांच्या शेतीचे सपाटिकरण करुन दयावे. विक्री व्यवस्था कार्यक्षम करुन खरेदि–विक्री संघातील अकार्यक्षमता दुरकराव्यात जिल्हयातील स्थलांतर कमी करण्यासाठी जिल्हयात कृषी प्रक्रिया उदयोगाबरोबर कृषी पर्यटन, चिल्ली पार्क, कॉटन पार्कची स्थापना करावी.

### *संदर्भ :–*

1)Mutatkar-Maharashtra Human Development Action Research study. Maharashtra Association of Anthropological Sciences Pune 2004.

2)Gazetter of India-Maharashtra State Gazetters, Dhule District, Bombay Gazetteers, Department Government of Maharashtra, 1974, Page No 484, 504.

3)गोरे गोविंद महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृती समस्सा, व विकास आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे 1988

4) सोनक, सुषमा, जोग, सुधीर, सिमिंटन अहवाल 1938 शिफारशी व निष्कर्ष आदिवासी संशोधन पत्रिका आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था पुणे.

5) हाकारा, बळीराजा, शेतकरी, योजना, अर्थसंवाद अंक 2014.

6)वार्षिक कर्ज योजना अग्रणी बॅक (स्टेट बॅक ऑफ इंडिया) जिल्हा नंदुरबार अहवाल 2013-14.

7)जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन नंदुरबार 2003-04 ते 2013-14.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org